
**Prof. Nilkantha Narule: Rajkarnat Pradeshik Pakshyanche Mahatva: Ek Addhyan**



ISBN 978-81-939083-4-1

# भारतीय राजकारण

भारतीय राजकारणावरील विविध शाखांच्या अध्यापकांनी
घेतलेल्या संशोधनपर लेखांचा संपदित ग्रंथ

संपादन
डॉ. अनिल विश्वास

टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

मूल्य दोनशे रुपये

- ISBN 978-81-939083-4-1

- **भारतीय राजकारण**
  Bhartiya Rajkaran

- **संपादन**
  डॉ. अनिल विश्वास

- सर्व हक्क सुरक्षित

- **प्रथमावृत्ती** १ ऑगस्ट, २०१९

- **प्रकाशन क्र.** २४

- **प्रती** ५००

- **आकार** डेमी

- **प्रकाशक**
  टिआरा पब्लिकेशन्स
  दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
  कोथरूड, पुणे ४११०२९
  tiarapublication@rediffmail.com

- मूल्य २०० रुपये

(या ग्रंथात प्रकाशित विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-5 |
| 1 | भारतातील लोकशाही | प्रा. रेखा वाठ | 6-8 |
| 2 | जागतिक राजकारणाची बदलती पद्धत | डॉ. अभय रानडे | 9-12 |
| 3 | राजकीय पक्षांची भूमिका | प्रा. एन.आर. उवळे | 13-15 |
| 4 | सत्तासंघर्षात पक्षाची बदलती भूमिका | डॉ. संजय वानखडे | 16-20 |
| 5 | भारत–चीन संबंध – एक अभ्यास | प्रा. डी.एस. पाटील | 21-23 |
| 6 | राजकारणातील राजकीय पक्षाचे बदलते स्वरूप | डॉ. सावित्री सनागळे | 24-26 |
| 7 | सत्तातरांचे बदलते स्वरूप विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सरोज लखदिवे | 27-29 |
| 8 | भारतीय राजकारण आणि राजकीय पक्ष | प्रा. डॉ. सुशीला डाबरे | 30-32 |
| 9 | राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व: एक अध्ययन | प्रा. नीळकंठ नरूले | 33-35 |
| 10 | यवतमाळातील सामाजिक समस्या व उपाय | प्रा. प्रशांत जवादे | 36-38 |
| 11 | महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडी | डॉ. संदेश सामटकर | 39-41 |
| 12 | बदलत्या परराष्ट्र धोरणाचा जागतिक राजकारणावर झालेला परिणाम | डॉ. कैलाश नेमाडे | 42-44 |
| 13 | राजकारणात नैतिक मापदंडाची पायमल्ली | डॉ. एस. एम. टाकळे | 45-49 |
| 14 | आपल्या देशापुढील परराष्ट्र धोरणाची आव्हाने | डॉ. गिरीधर साळवे | 50-52 |
| 15 | परराष्ट्र धोरण आणि आपली भूमिका | डॉ. डी.एम. चव्हाण | 53-55 |
| 16 | विविध राजकीय पक्षांची बदलती भूमिका – एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. पांडुरंग इंगळे | 56-57 |
| 17 | राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांचे बदलते स्वरूप | प्रा. दमयंती वाळके | 58-59 |
| 18 | इतिहासात महिलांचे स्थान : ऐतिहासिक अवलोकन | प्रा. शीतल राऊत | 60-63 |
| 19 | राजकीय पक्षांची बदलती भूमिका व परिणाम | प्रा. माणिकराव पवार | 64-65 |
| 20 | भारतीय राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांची बदलती पध्दत | प्रा.स्नेहल खांडेकर | 66-68 |
| 21 | राज्याच्या लोकशाहीत पक्षाची बदलती कार्यपध्दती | प्रा. डॉ. संजय बनसोडे | 69-70 |
| 22 | भारतीय संविधान | डॉ. वेद पतकी | 71-74 |
| 23 | भूतपूर्व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग | डॉ. वीरा मांडवकर | 75-77 |
| 24 | राजकीय पक्षांचे सत्तास्वार्थ | प्रा.डॉ. वैदेही सामरा | 78-83 |

# राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व: एक अध्ययन

प्रा. नीळकंठ नरूले
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना:

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही शासन व्यवस्था असलेला देश आहे. येथे ना एकपक्ष पध्दती आहे ना व्दिपक्ष आहे. येथे अनेक पक्ष पध्दती आहे, की जी जगात अनेक देशात प्रचलीत आहे. १५मार्च २०१९ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार भारतामध्ये एकूण २,३३४ राजकीय पक्ष असून त्यापैकी ७ राष्ट्रीय पक्ष, २६ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणीकृत पक्ष आहेत. महिन्याला काही पक्ष नव्याने निघतात तर काही बंद पडतात. अशी परिस्थिती राजकीय पक्षाची आहे.

आधुनिक लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. राजकीय पक्षांच्या शिवाय लोकशाही यशस्वी होवू शकत नाही. राजकीय पक्ष लोकशाही करिता एक आवश्यक अट ठरले आहे. कारण लोकमत संघटीत करण्यातही राजकीय पक्षांची भूमिका महत्वपूर्ण असते. सामान्य लोकांपर्यंत जावून राजकीय पक्ष आपले विचार जनतेच्या गळी उतरविण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असतो. सत्ता संपादनाचे स्वप्न साकार करण्यासाठी त्याला आपले विचार व राजकीय कार्यक्रम या संबंधीची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी लागते. अशारितीने जनतेला राजकीय शिक्षण देऊन लोकमत संघटीत करण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य राजकीय पक्ष करतात. भारतात ज्याप्रमाणे राष्ट्रीय पक्ष आहेत त्याचप्रमाणे प्रादेशिक पक्ष सुध्दा आहेत. प्रादेशिक पक्षांनी भारतात प्रादेशिकतेची भावना कायम ठेवली असा आरोप त्यांच्यावर केला जातो.त्यांच्यात मोठया प्रमाणावर उणिवा आहेत अशी टिका केली जाते. या गोष्टी जरी ख—या असल्यातरी प्रादेशिक पक्षांनी लोकशाहीचा संदेश देशाच्या कानाकोप—यात नेऊन पोहचवला हे सत्य आहे. म्हणून भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्व वाढलेले आपल्याला दिसून येते. याची सखोल माहिती जनतेला व्हावी या करीता या विषयाची निवड शोध निबंधासाठी संशोधकाने उत्साहाने, उस्फुर्त व सहेतुक केलेली आहे.

## संशोधनाची उदिदष्टे :

संशोधनाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी संशोधन कार्याला योग्य दिशा प्राप्त करुन देण्याकरीता उदिदष्टांचे निर्धारण करणे अत्यंत क्रमप्राप्त असते. हया अनुषंगाने प्रस्तुत अध्ययनाची खालीलप्रमाणे उद्दिष्टे आहेत.

१. प्रादेशिक पक्षांच्या वाटचालीतील चढ उतारांच्या कारणांची मिमांसा करणे.
२. स्थानिक पक्षांवर प्रभाव पाडणाऱ्या औपचारिक—अनौपचारिक घटकांचा अभ्यास करणे.
३. घटक राज्यातील प्रादेशिक पक्षांच्या नेतन्नत्वाच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
४. घटक राज्यातील प्रादेशिक पक्षाच्या राजकारणाचा व नेतन्नत्वाचा जनसामान्यावरील प्रभाव अभ्यासणे.
५. भारतातील प्रादेशिक पक्षांच्या बदलत्या राजकीय समिकरणाचा आढावा घेऊन राजकारणातील गतीशीलत्व स्पष्ट करणे.
६. राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष आणि इतर राजकीय पक्ष यांच्या प्रभावाचे तुलनात्मक अध्ययन करणे.

## गृहीतके :

पुढील गृहीतकांच्या आधारे संशोधनाची दिशा निश्चित करण्यात आली आहे.

१. प्रादेशिक पक्षांच्या वाटचालीत परंपरेने चालत आलेल्या घराणेशाहीतील नेतृवाचा प्रभाव खूप मोठा आहे.
२. सन १९९० पासून आजपर्यंत भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांनी आपला प्रभाव निर्माण केला आहे.
३. सन १९९१ नंतरच्या राजकारणाचा विचार करता भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांना यश येत आहे.
४. आज लोकसभा निवडणुकीत कोणत्याच एका राष्ट्रीय पक्षाला फारसा विजय प्राप्त करता आला नाही. याचे कारण भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्व, प्रभाव अधिक आहे.